दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## रायगडच्या 5 शेतकऱ्यांना परदेश दौऱ्याची संधी

**रायगड :** आधुनिक शेती तंत्रज्ञान, उत्पादनवाढीच्या पद्धती आणि विविध देशांतील शेतीतील प्रयोगांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी परदेश अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपले प्रस्ताव २५ ऑगस्ट २०२६ पूर्वी सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

## राज्यातील प्रत्येक विभागात भव्य लोककला महोत्सव : आशिष शेलार

**मुंबई :** महाराष्ट्रातील लोककला आणि लोककलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी आता राज्याच्या प्रत्येक विभागात भव्य लोककला महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. सध्या राज्यात विविध ठिकाणी लोककला महोत्सव सुरू असून, यापुढे त्यांचा विस्तार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. अखिल भारतीय लोककलावंत आणि मराठी तमाशा परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सन्मान रविंद्र नाट्य मंदिर येथे मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आला.

## थोडक्यात वार्ता

### नसलेली 80 आंब्यांची झाडे दाखवून भरपाई लाटली; व्याजासह वसूल करण्याचे खंडपीठाचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर :** जमिनीवर प्रत्यक्षात नसलेली आंब्याची 80 झाडे कागदोपत्री दाखवून भूसंपादनात झाडांच्या नुकसानभरपाईपोटी तब्बल 19 लाख 27 हजार रुपयांची वाढीव भरपाई लाटणाऱ्यांना झाडांसाठी दिलेली वाढीव नुकसानभरपाई व्याजासह परत करण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. न्या. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी हा आदेश दिला. जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील टाकळी पोखरी येथे पाझर तलावासाठी रावसाहेब चव्हाण आणि अप्पासाहेब चव्हाण यांच्या मालकीची गट क्र. 214 मधील जमीन शासनाकडून संपादित करण्यात आली होती. 2008 मध्ये भूसंपादन अधिकाऱ्यांनी याचा निवाडा दिला. मात्र, मिळालेला मोबदला कमी असल्याचा दावा करत या शेतकऱ्यांनी भूसंपादन न्यायालयात धाव घेतली. सुरुवातीला दाखल केलेल्या दाव्यात शेतकऱ्यांकडून कोणत्याही झाडांचा उल्लेख करण्यात आला नव्हता. मात्र, नंतर न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करताना अचानक '80 आंब्यांच्या झाडांचा' दावा घुसडण्यात आला. बनावट कागदपत्रांच्या आधारे 2016 मध्ये जालना येथील भूसंपादन न्यायालयाने या नसलेल्या झाडांसाठी तब्बल 19 लाख 27 हजार रुपयांची वाढीव भरपाई मंजूर केली होती.

### स्कूल व्हॅनचा भीषण अपघात; पाच वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू

**सांगली :** सांगलीतील शिराळा तालुक्यातून आटूगडेवाडी येथे स्कूल व्हॅनचा भीषण अपघात होऊन पाच वर्षीय मुलीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी सकाळी घडली. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने चारचाकी रस्त्यालगतच्या पुलाच्या कठड्यावर जोरदार आदळली. या अपघातात स्कूल व्हॅनमधील इतर काही मुले जखमी झाली असून त्यांच्यावर कोकरूड, शिराळा आणि कराड येथील विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. शिराळा येथील सह्याद्री पब्लिक स्कूलची इंग्रजी माध्यमाची दुसरी शाखा वाघमारेवाडी येथे वर्षभरापूर्वी सुरू करण्यात आली आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी शेडगेवाडी येथील युवराज कदम यांची चारचाकी वापरली जाते. सोमवारी सकाळी युवराज कदम गावातील विद्यार्थ्यांना घेऊन आटूगडेवाडी येथील एका विद्यार्थ्याला आणण्यासाठी गेले होते. विद्यार्थ्याला घेऊन परतत असताना आटूगडेवाडी येथे अचानक चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यानंतर चारचाकी रस्त्यालगत असलेल्या पुलाच्या कठड्यावर वेगाने जाऊन आदळली. या भीषण धडकेत चालकाच्या शेजारी बसलेली श्रीशा श्रीनाथ ऊर्फ गणेश इंगळे (वय ५, रा. मेणी) हिचा जागीच मृत्यू झाला. अपघातात स्कूल व्हॅनमधील इतर विद्यार्थीही जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी विद्यार्थ्यांना तातडीने बाहेर काढले. त्यानंतर त्यांना कोकरूड, शिराळा आणि कराड येथील विविध रुग्णालयांत उपचारासाठी दाखल करण्यात आले.या दुर्दैवी अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### माहिती अधिकारीपदी संजीवनी जाधव-पाटील



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी या पदावर संजीवनी जाधव-पाटील नुकत्याच रूजू झाल्या. जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने व अन्य कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. मूळच्या छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असणाऱ्या जाधव यांनी यापूर्वी उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे उपसंपादक, त्यानंतर विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, विभागीय माहिती कार्यालय , कोकण भवन नवी मुंबई येथे सहायक संचालक म्हणून कार्य केले आहे. जाधव-पाटील यांनी पत्रकारितेत बी.जे., एम.जे. तसेच एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. प्रशासनात येण्यापूर्वी स्थानिक दैनिकात उपसंपादक म्हणून कार्य केले आहे. तसेच आकाशवाणी केंद्रात प्रादेशिक वृत्तनिवेदिका, वृत्तवाहिनीमध्ये निवेदिका म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे.

# 'हिंदू प्रकाशवार्ता'च्या बातमीचा इम्पॅक्ट; उघड्या चेंबरला अखेर झाकण

## चिस्तीया चौक–एमजीएम मार्गावरील धोकादायक चेंबरची प्रशासनाकडून दुरुस्ती

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** चिस्तीया चौकाकडून एमजीएम रुग्णालयाकडे जाणाऱ्या वर्दळीच्या मार्गावरील उघड्या चेंबरमुळे निर्माण झालेल्या धोक्याची दखल अखेर संबंधित प्रशासनाने घेतली आहे. 'हिंदू प्रकाशवार्ता'ने काही दिवसांपूर्वी 'चिस्तीया चौक–एमजीएम मार्गावरील उघड्या चेंबरमुळे मृत्यूचा सापळा; तातडीने दुरुस्तीची मागणी' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या वृत्ताची दखल घेत काही दिवसांतच ड्रेनेज लाईनवरील धोकादायक चेंबरला नवीन झाकण बसविण्यात आले असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

चिस्तीया चौक ते एमजीएम रुग्णालयाकडे जाणाऱ्या मार्गावर चेंबरचे झाकण तुटल्यामुळे मोठा खड्डा उघडा पडला होता. रस्त्यावरून सातत्याने वाहनांची वर्दळ असल्याने हा खड्डा अपघाताला आमंत्रण देणारा ठरत होता. विशेषतः रात्रीच्या वेळी हा धोका अधिक वाढत होता. प्रशासनाकडून सुरक्षेच्या दृष्टीने केवळ काठीला लाल कापड बांधून इशारा देण्यात आला होता. मात्र हा उपाय पुरेसा नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती.



या मार्गावर रुग्णवाहिका, रिक्षा, दुचाकी, चारचाकी वाहने, विद्यार्थी आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. त्यामुळे उघड्या चेंबरमुळे कोणतीही दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. 'हिंदू प्रकाशवार्ता'ने नागरिकांच्या समस्येला वाचा फोडत प्रशासनाने तातडीने चेंबरला मजबूत झाकण बसवून परिसराची दुरुस्ती करावी, अशी मागणी बातमीद्वारे केली होती.

वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित विभागाने याची गंभीर दखल घेत चेंबरची पाहणी केली आणि त्यावर नवीन झाकण बसविण्याचे काम पूर्ण केले. त्यामुळे काही दिवसांपासून नागरिकांच्या जीवाला धोका ठरलेले हे ठिकाण आता सुरक्षित झाले आहे.

**नागरिकांतून समाधान**

'हिंदू प्रकाशवार्ता'च्या वृत्तामुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आणि तातडीने कार्यवाही झाली, याबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शहरातील रस्ते, चेंबर, ड्रेनेज आणि इतर नागरी समस्यांबाबत माध्यमांनी सातत्याने आवाज उठविल्यास प्रशासनाकडूनही तातडीने कार्यवाही होऊ शकते, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

### चिस्तीया चौक–एमजीएम मार्गावरील उघडे चेंबर म्हणजे मृत्यूचा सापळा

### तातडीने दुरुस्तीची मागणी




हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** चिस्तीया चौकाकडून एमजीएम रुग्णालयाकडे जाणाऱ्या वर्दळीच्या मार्गावर चेंबरचे झाकण पूर्णपणे तुटून मोठा खड्डा उघडा पडला असून नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. धोकादायक ठिकाणी प्रशासनाकडून केवळ एक काठी रोवून त्यावर लाल रंगाचे कापड बांधण्यात आले आहे. मात्र रात्रीच्या वेळी हा इशारा स्पष्ट दिसत नसल्याने दुचाकीस्वार, रिक्षाचालक तसेच चारचाकी वाहनचालकांना अपघाताचा मोठा धोका आहे.

विशेष म्हणजे, हा मार्ग एमजीएम रुग्णालयाकडे जाणारा असल्याने दिवसभर रुग्णवाहिका, विद्यार्थी, नागरिक आणि इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. चेंबरच्या आजूबाजूचा भागही खचल्यामुळे कोणतेही वाहन थेट खड्ड्यात जाऊ शकते. एखादी गंभीर दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. मोठी जीवितहानी टाळण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने मजबूत झाकण बसवून रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## खेळाडूंना आर्थिक मदत, आधुनिक सुविधा द्या; खासदार भुमरेंचा केंद्राकडे आग्रह

### पैठणच्या 400 मीटर सिंथेटिक धावपट्टीसाठी 14.37 कोटींच्या निधीची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**दिल्ली :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खेळाडूंना केंद्र शासनाच्या विविध क्रीडा योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा, तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील खेळाडूंना आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने विशेष सहकार्य करावे, अशी मागणी छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे यांनी केली. यासंदर्भात खासदार संदिपान भुमरे आणि पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी दिल्ली येथे केंद्रीय युवा कार्य व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.



या भेटीत जिल्ह्यातील खेळाडूंना प्रशिक्षण, स्पर्धांमध्ये सहभाग आणि इतर शहरांमध्ये सरावासाठी प्रवास करताना आवश्यक आर्थिक सहाय्य मिळावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राचा विकास करण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्यास केंद्र शासनाने सहकार्य करावे, अशी भूमिका खासदार भुमरे यांनी मांडली.

**पैठणमध्ये सिंथेटिक धावपट्टीसाठी निधीची मागणी**

पैठण परिसरात मोठ्या संख्येने युवा खेळाडू असून, त्यांना दर्जेदार ॲथलेटिक्स प्रशिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने अडचणींचा सामना करावा लागतो. तालुका क्रीडा संकुल, पैठण येथे ४०० मीटर सिंथेटिक रनिंग ट्रॅक उभारण्यासाठी अंदाजे १४.३७ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे आमदार विलास भुमरे यांनी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या निदर्शनास आणून दिले.

या प्रकल्पात अर्थवर्क, सब-बेस, ड्रेनेज, सिंथेटिक सरफेसिंग, ट्रॅक मार्किंग तसेच आवश्यक ॲथलेटिक्स सुविधांचा समावेश आहे. निधी मंजूर झाल्यास पैठणसह आसपासच्या ग्रामीण भागातील खेळाडूंना नियमित सराव, प्रशिक्षण आणि स्पर्धांची तयारी करण्यासाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत.

ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी मागण्यांबाबत सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले.

## महाराष्ट्रात पोलीस दलात 28 हजारांहून अधिक पदे रिक्त; पोलिसांवर कामाचा प्रचंड ताण

### पोलीस हक्क संघर्ष संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे तातडीने भरतीची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलात तब्बल २८ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अपुऱ्या मनुष्यबळाचा थेट ताण विद्यमान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर पडत असून, गुन्हे तपास, महिला सुरक्षा आणि दैनंदिन पोलीस सेवांवर याचा गंभीर परिणाम होत आहे. ही रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, अशी आक्रमक मागणी पोलीस हक्क संघर्ष संघटनेच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या संदर्भात पोलीस हक्क संघर्ष संघटनेचे राज्य सचिव नजीमोद्दीन काजी यांनी मुख्यमंत्री सचिवालय कक्ष आणि जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगरमार्फत मुख्यमंत्र्यांना लेखी निवेदन सादर केले आहे. सततच्या कामाचा ताण आणि अपुरी विश्रांती यामुळे पोलिसांच्या आरोग्याचा व कार्यक्षमतेचा प्रश्न निर्माण झाला असून, नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवरही याचा विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार पोलीस दलातील विविध संवर्गांमधील महत्त्वाची पदे मोठ्या प्रमाणावर खाली आहेत. यामध्ये पोलीस महासंचालक, पोलीस अधीक्षक व अपर पोलीस आयुक्त दर्जाची २९ पदे, पोलीस उपअधीक्षक १८५ पदे, पोलीस निरीक्षक ५२१ पदे, तर सहाय्यक पोलीस निरीक्षक २८७ पदे रिक्त आहेत. तसेच, पोलीस उपनिरीक्षक पदाची तब्बल २,८७८ पदे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक

-> पान 2 वर

## बंद पडलेली चारचाकी हटवण्यासाठी पोलिसांनाच द्यावा लागला धक्का!

### मोंढा नाका उड्डाणपुलाखाली वाहन बंद पडल्याने वाहतूक कोंडी



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मोंढा नाका उड्डाणपुलाखाली सोमवारी चारचाकी वाहन अचानक बंद पडल्याने काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला. वर्दळीच्या मार्गावरच वाहन बंद पडल्याने परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. त्यामुळे वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागला.

वाहतूक कोंडी वाढत असल्याचे लक्षात येताच वाहतूक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बंद पडलेले चारचाकी वाहन रस्त्याच्या बाजूला घेण्यासाठी पोलिसांनाच वाहनाला धक्का द्यावा लागला. पोलिसांच्या प्रयत्नांनंतर वाहन बाजूला करण्यात आले आणि वाहतुकीचा मार्ग मोकळा करण्यात आला. मोंढा नाका उड्डाणपुलाखालील मार्ग शहरातील महत्त्वाच्या वर्दळीच्या मार्गांपैकी एक आहे. त्यामुळे या ठिकाणी वाहन बंद पडताच त्याचा परिणाम आजूबाजूच्या वाहतुकीवर झाला. काही काळ वाहतूक विस्कळीत झाल्यानंतर पोलिसांनी वाहनांची ये-जा नियंत्रित करून परिस्थिती सुरळीत केली.

### जरांगे पाटील यांचा आम्हाला आदर; गैरसमज करून घेऊ नये

## 'त्या' बैठकीचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी कोणताही संबंध नाही : डॉ. तायडे पाटील

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा आम्ही नेहमीच आदर केला असून, मराठा समाजाला दिशा देणारे ते मोठे नेतृत्व आहे. त्यामुळे अपुऱ्या अथवा चुकीच्या माहितीच्या आधारे गैरसमज करून घेण्याऐवजी संबंधित घटनेची वस्तुस्थिती जाणून घ्यावी, असे महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेचे राज्य उपाध्यक्ष डॉ. संजयराव तायडे पाटील यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सांगण्यावरून मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात बैठक घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, या बैठकीचा शिंदे यांच्याशी कोणताही संबंध नसल्याचे डॉ. तायडे पाटील यांनी स्पष्ट केले.

संबंधित दिवशी रविवार असल्याने शाळा-महाविद्यालयांना सुट्टी होती. मराठा समाजासाठी गेल्या सुमारे ३० वर्षांपासून कार्यरत असलेल्या जुन्या सहकाऱ्यांची बैठक जवळच्या शिवछत्रपती कॉलेजच्या सभागृहात नियोजित होती. मात्र, तेथे दुसरा कार्यक्रम असल्याने अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर असलेल्या एका शाळेची जागा एक-दोन तास चर्चेसाठी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली. बैठकीतील अनेक जण त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक असल्याने ही विनंती मान्य करण्यात आली. या बैठकीमागे कोणताही राजकीय हेतू नव्हता तसेच जरांगे पाटील यांच्या विरोधात भूमिका घेण्याचाही प्रश्न नव्हता, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, मुख्यमंत्री असताना एकनाथराव शिंदे यांच्या सरकारने मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारे आरक्षण मिळावे, यासाठी ठोस पावले उचलली. मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण सिद्ध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत राज्यव्यापी सर्वेक्षण करण्यात आले. न्या. सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाचा अहवाल स्वीकारून त्याच्या आधारे मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्यात आले.

तसेच पात्र मराठा व्यक्तींना कुणबी जात प्रमाणपत्र मिळताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. जुन्या महसुली, शैक्षणिक, निजामकालीन तसेच अन्य शासकीय अभिलेखांमधील कुणबी नोंदी शोधण्याची मोहीम राबवून पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली.

त्यामुळे एकनाथराव शिंदे हे मनोज जरांगे पाटील किंवा मराठा समाजाच्या विरोधात आहेत, असा गैरसमज निर्माण करणे योग्य नाही. वैयक्तिक अथवा राजकीय स्वार्थासाठी कोणी चुकीची किंवा अपूर्ण माहिती देत असेल, तर तिची खातरजमा करूनच त्यावर विश्वास ठेवावा. आम्ही जरांगे पाटील यांचे विरोधक नाही. त्यांच्याबद्दलचा आदर कायम असून, गैरसमज दूर करण्यासाठी आवश्यक असल्यास त्यांच्यासमोर संपूर्ण वस्तुस्थिती मांडण्यास तयार आहोत, असे डॉ. संजयराव तायडे पाटील यांनी स्पष्ट केले.

## शहरातील पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन व विकासकामांचा आढावा; शिवसेना नेते, आमदार अंबादास दानवेंची महापौर समीर राजूरकर यांच्यासमवेत चर्चा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांनी सोमवारी (१० ऑगस्ट) महापौर समीर राजूरकर यांच्यासमवेत छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध प्रश्न व विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी शहरातील पाणीपुरवठा, कचरा व घनकचरा व्यवस्थापन, मिटमिटा सफारी पार्क, एन-६ येथील बाळासाहेब ठाकरे उद्यान व पुतळा तसेच मंजूर आणि प्रलंबित रस्ते विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली.

शहरातील नवीन पाणीपुरवठा योजनेतून सध्या ३० एमएलडी पाणी उपलब्ध होत असले, तरी काही भागांत अद्याप सात ते नऊ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत आहे. शहरातील सुमारे ४५ हजार नळजोडण्या देणे बाकी असून, त्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहिती महापौर समीर राजूरकर यांनी दिली.



शहरात दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे ५०० मेट्रिक टन कचऱ्याचे व्यवस्थापन तसेच जुन्या कचरा साठ्यांचा प्रश्न यावरही यावेळी चर्चा झाली. कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही आढावा घेण्यात आला.

मिटमिटा सफारी पार्कसाठी प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची परवानगी मिळविण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांच्या कामांचा आढावा घेत प्रलंबित विकासकामांना गती देण्याबाबत आमदार अंबादास दानवे यांनी सूचना केल्या.

याप्रसंगी मनपा गटनेते गणेश लोखंडे, माजी महापौर सुदाम सोनवणे, राशीद मामू, राजू इंगळे, किशोर कच्छवाह, बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर डांगे, गोपाल कुलकर्णी, प्रमोद ठेंगडे, वीरभद्र गादगे, सचिन खैरे, राहुल सोनवणे, राहुल वाणी, मंगेश भाले, कान्हूलाल चक्रनारायण, दिनेश राजेभोसले, सुनीता सोनवणे व वैशाली कोरडे उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## संसदेतील राजकीय संघर्ष आणि उत्तरदायित्व

दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावरील पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरून संसदेतील सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आता अधिकच तीव्र आणि टोकाला पोहोचला आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची आणि पंतप्रधानांच्या माफीची केलेली मागणी, तर दुसरीकडे सरकारने संसदेत चर्चेची दर्शवलेली तयारी यामुळे पावसाळी अधिवेशनातील वातावरण पूर्णपणे तापले आहे. लोकशाहीत विद्यार्थ्यांवरील बळप्रयोगासारख्या संवेदनशील विषयावर प्रश्न विचारणे हा विरोधकांचा अधिकार असला, तरी या मुद्द्यावरून संसदेचे कामकाज रोखण्यापेक्षा पटलावर सविस्तर चर्चा होणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या मोर्चावर पोलिसांकडून झालेल्या कारवाईचे स्वरूप आणि त्यामागील आदेश कोणाचे होते, यावरून विरोधकांनी सरकारला थेट घेरले आहे. 'सामान्य भाषण' ऐकण्याऐवजी थेट आणि स्पष्ट उत्तर देण्याची मागणी करत विरोधकांनी राजकीय उत्तरदायित्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. दिल्लीतील या घटनेसोबतच अयोध्येतील राम मंदिर देणगीतील कथित गैरव्यवहाराचा मुद्दाही विरोधकांनी ऐरणीवर आणल्याने सरकारवरील राजकीय दबाव वाढला आहे. दुसरीकडे, संसदीय कामकाज मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार गृहमंत्री अमित शाह स्वतः या विषयावर संसदेत उत्तर देण्यास तयार आहेत. लोकशाही प्रणालीत संसदेचे सभागृह हेच स्पष्टीकरण आणि उत्तरदायित्वाचे सर्वोच्च व्यासपीठ मानले जाते. सरकार जर चर्चेस तयार असेल, तर विरोधकांनी केवळ राजीनाम्याच्या मागणीवर ठाम न राहता गृहमंत्र्यांचे स्पष्टीकरण ऐकून घेणे आणि त्यावर तर्कशुद्ध युक्तिवाद करणे अपेक्षित आहे. केवळ घोषणाबाजी आणि कामकाज तहकूब होण्याने मूळ प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत आणि करदात्यांच्या पैशांचाही अपव्यय होतो. पोलीस कारवाईची सत्यता, परिस्थितीचे गांभीर्य आणि निष्पक्ष चौकशीची आवश्यकता यावर संसदेच्या पटलावरच स्पष्टता येऊ शकते. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांनी राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन संवादाचा मार्ग स्वीकारावा आणि या कोंडीतून मार्ग काढावा, हीच लोकशाहीची खरी अपेक्षा आहे.

# बळीराजाला आधार शेतीला नवी उभार

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी** :-महाराष्ट्रातील बळीराजांनी या संधीचा सुवर्णकाळ म्हणून स्वीकार करून आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी आणि राज्याच्या समृद्धीचा एक नवा सुवर्ण इतिहास स्वतःच्या हाताने कोऱ्या पाठीवर लिहावा.....

महाराष्ट्रातील शेती ही केवळ एक व्यवसाय नसून ती राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा श्वास आहे. राज्याचा मोठा लोकवर्ग शेतीवर अवलंबून असताना गेल्या अनेक वर्षापासून शेती क्षेत्राला नैसर्गिक आपत्ती हवामानातील अनिश्चितता आणि वाढत्या उत्पादन खर्चाचे ग्रहण लागले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव संजीवनी येण्याचा आणि हातबल झालेल्या बळीराजाला पुन्हा एकदा ताट मानेने उभे करण्याचा एक महत्वकांक्षी प्रयत्न आहे.

या निर्णयाबद्दल शेतकरी कृतज्ञता व्यक्त करत असताना वीज बिल माफी एक मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना अधिकचा दिलासा दिला.

महाराष्ट्रातील शेतीची व्यथा ही दीर्घकालीन आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी आणि गारपीट अशा नैसर्गिक संकटांच्या चक्रात शेतकरी पिचला होता. राज्यातील सिंचनाच्या मर्यादित सुविधांमुळे आजही मोठ्या प्रमाणावर शेती ही पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे. त्यातच हवामान बदलाच्या फटक्यामुळे अनिश्चितता अधिकच वाढली आहे. केवळ नैसर्गिक संकटच नव्हे तर आर्थिक कोंडी हे एक मोठे वास्तव आहे. त्यामुळेच कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र भेदण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी घेतलेला हा निर्णय काळाची गरज म्हणून समोर आला आहे....

नजीकच्या काळात कोणतीही निवडणूक नसताना मुख्यमंत्र्यांनी घेतलेला हा निर्णय शासन किती लोकाभिमुख आहे याचीच प्रचिती देणार आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कोरडेपणाने बोलणारे राजकारणी ढिकाने आहेत. पण प्रत्यक्षात आधी केलेची पाहिजे असे कृतीने दाखवून देणारा शासक विरळाच. आधीच्या सरकारात केवळ शेतकऱ्यांच्या बांधावर गप्पा मारणारे नेते पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही बाब समाधानाची आहे....

कोणतीही कर्जमाफी ही अंतिम उपाय नसली तरी काही विशिष्ट कालखंडात ती एक अनिवार्य ऑक्सिजन असते शेती आज अत्यंत जोखमीचा व्यवसाय बनला आहे. पीक कर्जाची वेळेवर परतफेड न झाल्यामुळे शेतकरी बँकांच्या थकबाकीदार यादी जातो आणि पर्यायाने त्याला नवीन कर्ज मिळणे बंद होते. एकदा का बँकांचे दरवाजे बंद झाले की तो पुन्हा सावकारांच्या जाळ्यात अडकतो. सावकारी कर्जाचे व्याजाचे चक्र इतके भयावह असते की शेतकरी त्यातून कधीच बाहेर पडू शकत नाही. या व्यतिरिक्त मानसिक स्वास्थ्याचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्येच्या घटनाही राज्याच्या प्रतिमेला लागलेली एक काळी किनार आहे. कर्जबाजारीपणामुळे येणारे निराश्य आणि सामाजिक बदनामीची भीती यामुळे अनेक शेतकरी टोकाची भूमिका घेतात. अशा परिस्थितीत शासनाने घेतलेले कर्जमाफीचा निर्णय शेतकऱ्यांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठीचा एक आधार आहे. कर्जमुक्त शेतकरी बँकिंग प्रणालीत पुन्हा सन्मानाने प्रवेश करतो तेव्हा त्याचा स्वाभिमान जागृत होतो.

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या या घोषणेची फलित बहुआयामी असेल. कर्जाच्या ओझ्यातून मुक्त झालेला शेतकरी आता भविष्यातील शेतीचे नियोजन नव्याने करू शकते. थकित कर्ज नसल्यामुळे त्याला पीक कर्ज सहज उपलब्ध होईल. ज्याचा थेट फायदा पेरणीच्या हंगामात दिसून येईल. दुसरेही कर्ज माफी ग्रामीण बाजारपेठेला चालना देणारी ठरेल. शेतकऱ्यांच्या हातात पैसा येतो तेव्हा तो कृषी सेवा केंद्र. ट्रॅक्टरची दुरुस्ती शेती अवजारे किंवा कुटुंबाच्या गरजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी खर्च होतो. म्हणजेच ही रक्कम शेवटी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या खेळत्या भांडवलात रूपांतरित होते. आर्थिक स्थैर्य आल्यानंतरच शेतकरी आधुनिक ठिबक सिंचन. हरितगृह किंवा यंत्रांचा वापर करण्याकडे वळू शकतो. ही घोषणा त्यांना त्या गुंतवणुकीसाठी बळ देईल...

मुख्यमंत्र्यांनी घेतलेला साडेचार अश्र्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांच्या वीज बिलांची तब्बल 48 हजार कोटी रुपयांनी जुनी थकबाकी पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय धाडसी आणि ऐतिहासिक म्हणावा लागेल. ही घोषणा केवळ तात्पुरते राजकीय मलम नसून राज्याच्या कृषी आणि ऊर्जा क्षेत्राला एका नव्या आणि शाश्वत युगाकडे घेऊन जाणारी आर्थिक आणि संररचनात्मक क्रांती आहे या व्यापक निर्णयाचे दुर्गा मी परिणाम शेतीसाठी विजेचे मूलभूत महत्व. थकबाकीचे ऐतिहासिक ओझे आणि या संपूर्ण धोरणामागचे अर्थकारण यांचे सखोल आणि विश्लेषणपूर्ण मूल्यमापन करणे गरजेचे ठरते. या ऐतिहासिक जुन्या वीज थकबाकी माफीचा निर्णय आणि चालू वीज बिलांचे पूर्ण निर्मूलन केवळ एक लोककल्याणकारी राजकीय निर्णय नसून ती महाराष्ट्राच्या कृषी आणि ऊर्जा क्षेत्राला स्वावलंबी बनवणारी एक प्रगल्भ आर्थिक क्रांती आहे.

तात्पुरत्या स्वरूपातील कर्जमाफीच्या पलीकडे जाऊन विक्रेंद्रित सौर प्रकल्पांच्या माध्यमातून कृषी फिडर्सचे सौरऊर्जीकरण करणे आणि शेतकऱ्यांना दिवसा.8. ते 12 तास अखंडित बीज मिळवून देणे हाच ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी येणारा खरा राजमार्ग आहे. याच्या जोडीला प्रस्तावित 50 हजार गट शेतीचे उपक्रम भव्य जलसंधारण प्रकल्प आणि नदी जोड योजनांमुळे राज्यातील कृषी क्षेत्राचे भविष्य निश्चितच उज्वल होईल.

# हळद उत्पादनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड; वनामकृवितर्फे आद्यरेखा प्रात्यक्षिकांतर्गत हळद रोपांचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते वाटप

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत उपक्रमास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी** :वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या उद्यानविद्या विभागातर्फे एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत 'आद्यरेखा (फ्रंटलाईन) प्रात्यक्षिक – हळद रोप वाटप' कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले. सुधारित हळद लागवड तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांमध्ये प्रसार करणे, दर्जेदार लागवड साहित्याचा वापर वाढविणे तसेच हळदीचे उत्पादन, गुणवत्ता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी भूषविले. यावेळी शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे तसेच प्रमुख अन्वेषक तथा उद्यानविद्या विभागाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ खंदारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते शेतकऱ्यांना हळद रोपांचे वाटप करण्यात आले. आद्यरेखा प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सुधारित हळद लागवड पद्धती, योग्य लागवड अंतर, दर्जेदार व निरोगी लागवड साहित्याचा वापर, पीक व्यवस्थापन, रोग व कीड व्यवस्थापन तसेच आधुनिक फलोत्पादन तंत्रज्ञान याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत २८ हून अधिक शेतकऱ्यांना एकूण ६० हजार हळद रोपांचे वाटप करण्यात आले. या माध्यमातून शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार असून, स्थानिक पातळीवर आधुनिक हळद उत्पादन पद्धतींचा प्रसार होण्यास मदत होणार आहे. विशेषतः दर्जेदार लागवड साहित्याचा वापर, शास्त्रीय पीक व्यवस्थापन आणि उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने हे प्रात्यक्षिक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

हळद हे मराठवाड्यातील महत्त्वाचे मसाला व नगदी पीक असून, बदलत्या हवामान परिस्थितीत उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी शास्त्रीय व तंत्रज्ञानाधारित पीक व्यवस्थापन आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना विद्यापीठातील संशोधनातून विकसित व शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती प्रत्यक्ष शेतपातळीवर उपलब्ध करून देणे हा या आद्यरेखा प्रात्यक्षिकाचा महत्त्वाचा भाग आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना दर्जेदार लागवड साहित्य, सुधारित उत्पादन तंत्रज्ञान आणि शास्त्रीय मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्यास हळद उत्पादनाची उत्पादकता व गुणवत्ता वाढविण्यास निश्चितच मदत होईल. विद्यापीठाच्या संशोधनाचा थेट लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा प्रात्यक्षिकांचा प्रभावीपणे उपयोग व्हावा. हळद उत्पादन अधिक शाश्वत, गुणवत्तापूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

उद्यानविद्या विभागाचे प्रमुख अन्वेषक डॉ. विश्वनाथ खंदारे, सहायक अन्वेषक डॉ. अंशुल लोहकरे आणि सहायक अन्वेषक डॉ. शबनम सय्यद यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला. यावेळी डॉ. बसलिंगअप्पा कलालबंडी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यामध्ये प्रात्यक्षिकाधारित प्रशिक्षण, आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार आणि शेतकऱ्यांपर्यंत संशोधनाचे निष्कर्ष पोहोचविण्यास विशेष महत्त्व दिले जाते. या उपक्रमामुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष लाभ मिळून उत्पादनक्षमता, गुणवत्तावाढ आणि आर्थिक शाश्वततेस चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## अजिंठा–बुलढाणा रस्त्याची दुरुस्ती करा; अन्यथा रास्ता रोको आंदोलन करु : रामेश्वर आप्पा काळे

**अजिंठा प्रतिनिधी :** अजिंठा–बुलढाणा रोडवरील हॉटेल विराज ते दत्तात्रय राठोड यांच्या शेतजमीन गट क्रमांक ९१५ पर्यंतचा रस्ता अत्यंत खराब व अपूर्ण अवस्थेत असल्याने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे (उद्धव ठाकरे गट) सिल्लोड तालुका उपप्रमुख रामेश्वर आप्पा काळे यांनी केली आहे.



अजिंठा–बुलढाणा हा नागरिक व वाहनधारकांसाठी महत्त्वाचा मार्ग असून, या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. तसेच काही ठिकाणी रस्त्याचे काम अपूर्ण राहिल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खराब रस्त्यामुळे वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच अपघाताची शक्यताही वाढली आहे.

या गंभीर समस्येकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन रस्त्याची पाहणी करावी आणि दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी रामेश्वर आप्पा काळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्यात आली नाही, तर अजिंठा–बुलढाणा रोड येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेचे सिल्लोड तालुका उपप्रमुख रामेश्वर आप्पा काळे यांनी दिला आहे.

## महाराष्ट्रात पोलीस दलात 28 हजारांहून अधिक पदे रिक्त; पोलिसांवर कामाचा प्रचंड ताण

### पोलीस हक्क संघर्ष संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे तातडीने भरतीची मागणी

**पान 1 वरून ->**

पदाची १,५६२ पदे, तर पोलीस हवालदार व पोलीस शिपाई मिळून तब्बल २३,२७२ पदांचा समावेश आहे.

मनुष्यबळाच्या या कमतरतेमुळे एकाच कर्मचाऱ्याला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत आहेत. विशेषतः सायबर गुन्हेगारी, महिला आणि बालकांची सुरक्षा, वाहतूक नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद यावर याचा मोठा प्रभाव पडत आहे. कायदा आणि सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी ही पोकळी भरून काढणे गरजेचे असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

रिक्त पदे ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात न भरता, भविष्यात अशी परिस्थिती ओढवू नये यासाठी नियोजनबद्ध आणि नियमित पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात यावी. पोलीस हक्क संघर्ष संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष एडवोकेट झेबा अब्दुल कदीर शेख व राष्ट्रीय सचिव राजेंद्र लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशानुसार, राज्य सचिव नजीमोद्दीन काजी यांनी हे निवेदन दिले असून, राज्य सरकारने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन भरतीबाबत त्वरित निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

## महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे संचालक अशासकीय सदस्य संख्याची तात्काळ वाढ करणे अशी मागणी गौरक्षक सेना महाराष्ट्र

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी** :गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्य च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री पशुसंवर्धन विभागाचे मंत्री महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष तथा पशुसंवर्धन विभाग च्या प्रशासनाकडे १) महाराष्ट्र गोसेवा आयोग मध्ये संचालकाची -सदस्यांची संख्या वाढ करणे बाबत

२) महाराष्ट्र गोसेवा आयोगामध्ये सदस्यांची संख्या 18 ते 21 करणे बाबत

३) महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य हे प्रत्येक विभागातून किंवा दोन जिल्ह्यातून एक सदस्याची नियुक्ती करणे बाबत

४) महाराष्ट्र गोसेवा आयोगामध्ये उपाध्यक्ष पद नव्याने निर्माण करणे बाबत

५) महाराष्ट्र गोसेवा आयोगामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये गोसेवा आयोगाचा प्रतिनिधी नेमणे करणे बाबत या अशा प्रकारच्या विषयाची गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्याच्या वतीने महाराष्ट्र सरकार मधील मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्याकडे गोमातेच्या गोसेवक गौरक्षक गो संरक्षणाच्या गोशाळा व पालक संदर्भातल्या अडीयाचे अडचणी नव्याने मुद्दा अमलात आणण्यासाठी निवेदनाच्या माध्यमातून महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या मध्ये संचालकाची व सदस्यांची संख्या मध्ये वाढ करणे महाराष्ट्र गोसेवा आयोगामध्ये उपाध्यक्ष पद नव्याने तयार करणे महाराष्ट्र गो सेवा आयोगामध्ये महाराष्ट्राच्या 36 जिल्ह्यामधून प्रत्येक 18 ते 21 संचालक सदस्याच्या निवड करणे महाराष्ट्र गोसेवा आयोगामध्ये प्रत्येक विभागातून दोन जिल्ह्यातून एक सदस्याची नियुक्ती करावी महाराष्ट्र गोसेवा आयोग मध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक आयोगाचा प्रतिनिधी नेमणूक करणे अशा वरील सर्व मागण्या निवेदनाच्या माध्यमातून तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी



गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर (गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश मंत्री), भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज उखळीकर (गौरक्षक सेना मराठवाडा विभागीय अध्यक्ष), 1008 महामंडलिकेश्वर सचितानंद सरस्वती अशोक महाराज पवार (गौरक्षक सेना मराठवाडा वरिष्ठ उपाध्यक्ष) ,योगगुरू चंपालाल देवतवाल ठाकूर (गौरक्षक सेना मराठवाडा प्रचारक),अँड निवृत्ती कदम (गौरक्षक सेना जिल्हा कार्यकारणी सदस्य) गोपाला गोसेवक गोरक्षक यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या च्या वतीने मागणी करण्यात आली

अशी माहिती

गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश मंत्री तथा कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी चे अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

प्रतिलिपी केंद्रीय पशुसंवर्धन विभाग मंत्री महाराष्ट्र- भारत सरकार केंद्रीय गोसेवा आयोग महाराष्ट्र व भारत सरकार पशुसंवर्धन विभाग केंद्रीय व राज्य

## दिव्यांग, तृतीयपंथीयांसह वंचित घटकांतील मतदारांसाठी विशेष मतदार नोंदणी मोहीम

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात सध्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दिव्यांग, तृतीयपंथीय, महिला सेक्स वर्कर्स, अनाथ, बेघर तसेच फुटपाथवर राहणाऱ्या पात्र नागरिकांचा मतदार यादीत जास्तीत जास्त समावेश करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विशेष उपाययोजना व मोहीम हाती घेण्यात आली आहे. जिल्ह्यात ३० जून २०२६ पासून मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर सध्या दावे व हरकती स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू असून, मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून घरोघरी भेट देऊन गणना प्रपत्र भरून घेण्याची कार्यवाही केली जात आहे. समाजातील हे सर्व वंचित घटक मतदानापासून वंचिज राहू नयेत, यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने विशेष नियोजन केले असून, सर्व मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना या घटकांतील पात्र नागरिकांच्या नोंदणीसाठी आवश्यक त्या सर्व सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेचा एक भाग म्हणून, शहरातील १०७-औरंगाबाद मध्य, १०८-औरंगाबाद पश्चिम आणि १०९-औरंगाबाद पूर्व या विधानसभा मतदारसंघांसाठी संयुक्तपणे जिल्हा समाज कल्याण कार्यालयात तृतीयपंथीय मतदार नोंदणीची एक विशेष मोहीम पार पडली. या विशेष मोहिमेला संबंधित नागरिकांकडून अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजातील प्रत्येक पात्र नागरिकाला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा आणि कोणताही पात्र मतदार नाव नोंदणीपासून सुटू नये, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या आदेशानुसार आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहे.

## जात वैधतेचा तिढा सुटंना, आदिवासींचा ठिय्या; न्याय मिळेपर्यंत मागे हटणार नाही कोळी-मल्हारचा पवित्रा!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

कोळी महादेव आणि कोळी मल्हार या अनुसूचित जमातीच्या बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळताना भेडसावणाऱ्या जाचक अटी व प्रशासकीय अडचणी तात्काळ दूर कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कार्यालयासमोर हजारो आदिवासी बांधवांनी आक्रमक पवित्रा घेत ठिय्या आंदोलन छेडले आहे. जात पडताळणी समितीकडून हक्काची व वैध प्रकरणे सुद्धा जाणीवपूर्वक किंवा तांत्रिक कारणास्तव अवैध




ठरवली जात असल्याचा गंभीर आरोप करत, वृत्तसंकलन करणाऱ्या प्रतिनिधींशी बोलताना आंदोलकांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. यापूर्वी याच न्याय्य मागण्यांसाठी समाजबांधवांनी तब्बल १२ दिवस अन्नत्याग उपोषण केले होते. त्यावेळी आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने व समितीने हा प्रश्न सोडवण्यासाठी ६० दिवसांची मुदत मागितली होती. मात्र, दिलेली ती मुदत संपूनही समितीकडून कोणतीही ठोस कार्यवाही किंवा सकारात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही. मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो कोळी महादेव व कोळी मल्हार समाजाच्या नागरिकांनी समितीच्या कार्यालयावर धडक देत तीव्र रोष व्यक्त केला. प्रशासनाच्या या टोलवाटोलवीच्या भूमिकेमुळे संतप्त झालेल्या आंदोलकांनी कार्यालयासमोर ठिय्या देत परिसर जोरदार घोषणाबाजीने दणाणून सोडला.

वारंवार कागदपत्रांची पूर्तता करूनही वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने अनेक आदिवासी विद्यार्थी आणि नोकरदारांचे शैक्षणिक व व्यावसायिक नुकसान होत आहे. जोपर्यंत प्रलंबित प्रकरणांवर कोणताही ठोस आणि अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत कार्यालय सोडणार नाही, असा इशारा संतप्त आंदोलकांनी दिला असून, या गंभीर प्रश्नावर आता शासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय मिळवून द्यावा, अशी जोरदार मागणी जोर धरत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## ई-केवायसी विशेष मोहिमेचे आयोजन; नागरिकांना लाभ घेण्याचे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचे आवाहन

**परभणी, :- -** परभणी जिल्ह्यातील सर्व गॅस कंपन्यांच्या (इंडेन, भारत गॅस, एच.पी. गॅस इत्यादी) नोंदणीकृत लाभार्थ्यांचे ई-केवायसी (e-KYC) पूर्ण करण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट २०२६ ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विशेष मोहीम व कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे यांनी दिली आहे. शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्देशानुसार, गॅस जोडणीधारकांचे e-KYC पूर्ण असणे अनिवार्य आहे. e-KYC अपूर्ण राहिल्यास लाभार्थ्यांना शासनाच्या अनुषंगिक सुविधा अथवा अनुदानाचा (Subsidy) लाभ मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील प्रलंबित e-KYC चे काम मुदतीत पूर्ण करण्यासाठी तहसील स्तरावर विशेष मोहीम राबवली जात आहे.

**लाभार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना व आवाहन: विशेष मोहीम कालावधी:** ११ ऑगस्ट २०२६ ते १६ ऑगस्ट २०२६. ठिकाण - तालुक्यातील सर्व तहसील कार्यालये, नागरी व ग्रामीण भागातील नियुक्त केंद्रे आणि संबंधित गॅस वितरक (गॅस एजन्सी) कार्यालये.

**आवश्यक कागदपत्रे:**गॅस पासबुक/ग्राहक क्रमांक (Consumer ID), आधार कार्ड व नोंदणीकृत मोबाईल क्रमांक. कृती- ज्या लाभार्थ्यांचे e-KYC प्रलंबित आहे, त्यांनी तात्काळ आपल्या गॅस वितरकाशी संपर्क साधून अथवा आयोजित विशेष कॅम्पमध्ये उपस्थित राहून e-KYC प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. सदर मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायत, तलाठी, कोतवाल, रास्त भाव धान्य दुकानदार व गॅस वितरकांमार्फत व्यापक पूर्वसूचना व प्रसिद्धी दिली जात आहे. तांत्रिक कारणांमुळे e-KYC न झालेल्या ग्राहकांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून गॅस कंपन्यांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तरी परभणी जिल्ह्यातील सर्व गॅसधारकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन आपले e-KYC १००% पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी 2.0 पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरु

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून अनुसूचित जाती (एस. सी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. या योजनांसाठी शैक्षणिक वर्ष 2026-27 ची अर्ज प्रक्रिया महाडीबीटी 2.0 पोर्टलवर सुरू झाली असल्याची माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस. के. भोजने यांनी दिली आहे. इयत्ता 9 वी ते 10 वी मधील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत), साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती, इयत्ता 5 वी ते 7 वी व 8 वी ते 10 वी मधील मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती तसेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजना यांचा समावेश आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी 2.0 पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत. अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पालक तसेच सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस. के. भोजने यांनी केले आहे.

## शासकीय वसतिगृहातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 15 सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभण :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात विविध ठिकाणी शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांमध्ये शालेय, इयत्ता ११ वी व १२ वी तसेच बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शासकीय वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज ७ ऑगस्ट २०२६ ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत "समाज कल्याण विभागाच्या ऑनलाइन पोर्टलवर" **https:**//hmasnew.mahait.org/ स्वीकारण्यात येणार आहेत.

संबंधित वसतिगृहातील प्रवेशाच्या जागा शिल्लक राहिल्यास, मुदत संपल्यानंतरही केवळ त्या वसतिगृहासाठी अर्ज स्वीकारण्यात येतील. तसेच दर आठवड्याला पुढील निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या व शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावा. तसेच अर्जाची प्रत संबंधित वसतिगृहाच्या गृहपालांकडे जमा करावी, असे आवाहन सहायक आयुक्त, आर. एच. एडके यांनी केले आहे.

# सिल्लोड बाजार समितीच्या सभापतीपदी सतीश ताठे, उपसभापतीपदी अनुसयाबाई मोरे

## दोन्ही पदांची बिनविरोध निवड; आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार

***सिल्लोड* (प्रतिनिधी) दि. १० :** सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी सतीश हरिदास ताठे तर उपसभापतीपदी सौ. अनुसयाबाई कौतिकराव मोरे यांची बिनविरोध निवड झाली. सभापती व उपसभापती पदाची निवड जाहीर होताच बाजार समितीच्या आवारात शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष करत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

### सिल्लोड बाजार समितीच्या इतिहासात प्रथमच महिला उपसभापती

**सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जवळपास ६० वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिलेला उपसभापतीपदाचा मान मिळाला आहे. सौ. अनुसयाबाई कौतिकराव मोरे यांची बाजार समितीच्या १५ व्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इतिहासात महिला नेतृत्वाचा नवा अध्याय सुरू झाला आहे.**

याप्रसंगी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार, शिवसेना तालुकाप्रमुख तथा संचालक केशवराव तायडे, जि.प. सदस्य देविदास पालोदकर, जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन पा. गाढे, सय्यद नासेर हुसेन, राजुबाबा काळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा संचालक प्रभाकर काळे, किशोर अग्रवाल, जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, देविदास पा. लोखंडे, शहरप्रमुख मनोज झंवर, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, कृउबा समितीचे संचालक विश्वास दाभाडे, नंदकिशोर सहारे, दारासिंग चव्हाण, दामूअण्णा गव्हाणे, जयराम चिंचपुरे, सुनील पाटणी, संदीप राऊत, शालिनी नानासाहेब रहाटे, राजाराम पाडळे, रमेश लाठी, भावराव लोखंडे, शेख जावेद शेख जहिर, यांच्यासह उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, सयाजीराव वाघ, संजय डमाळे, सुधाकर पाटील, गणेश पाटील, शेख सलीम हुसेन, हरिदास ताठे, विशाल जाधव, प्रशांत क्षीरसागर, कौतीकराव मोरे, राजू गौर, पप्पू जगनाडे, अक्रम देशमुख, रफिक देशमुख, अक्षय मगर, मुरलीधर शेजुळ, लक्ष्मण जगताप आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात आयोजित कार्यक्रमात नवनिर्वाचित सभापती सतीश ताठे व उपसभापती सौ. अनुसयाबाई मोरे यांचा माजीमंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




सभापती पदासाठी सतीश ताठे तर उपसभापती पदासाठी अनुसयाबाई मोरे यांचा प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाला होता. त्यामुळे पीठासीन अधिकारी तथा सहाय्यक निबंधक विजयसिंग लखवाल यांनी सतीश ताठे यांची सभापतीपदी तर अनुसायबाई मोरे यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. बाजार समितीचे सचिव विश्वास पाटील यांनी निवडणूक प्रक्रियेसाठी सहकार्य केले.

सभापतीपदासाठी सतीश ताठे यांना संचालक केशवराव तायडे यांनी सूचक तर संदीप राऊत यांनी अनुमोदन दिले. तसेच उपसभापतीपदासाठी अनुसयाबाई मोरे यांना दामूअण्णा गव्हाणे यांनी सूचक तर शेख जावेद यांनी अनुमोदन दिले.

**एक वर्षाचा फार्म्युला; पाच वर्षांत दहा जणांना संधी**

आमदार अब्दुल सत्तार यांनी ठरवून दिलेल्या फार्म्युल्यानुसार २४ जुलै २०२६ रोजी विश्वास दाभाडे व संदीप राऊत यांनी सभापती व उपसभापती पदाचा राजीनामा दिला होता. त्यानुषंगाने आज सभापती व उपसभापती पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थित संचालक मंडळाला मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून बाजार समितीच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी समन्वयातून काम करावे, असे आवाहन केले.

सभापती व उपसभापती पदासाठी एक वर्षाचा फार्म्युला ठरविण्यात आला असून, त्यानुसार पाच वर्षांच्या कालावधीत दहा जणांना सभापती व उपसभापती म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी उपबाजार सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच बाजार समितीच्या आवारात पायाभूत व मूलभूत सुविधांची कामे करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.

**महिला नेतृत्वाला संधी**

सिल्लोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेनंतरच्या जवळपास ६० वर्षांच्या कालावधीत प्रथमच महिलेला उपसभापतीपदाची संधी मिळाली आहे. त्यामुळे सौ. अनुसयाबाई मोरे यांच्या निवडीचे विशेष महत्त्व असून, त्यांच्या माध्यमातून बाजार समितीच्या संचालक मंडळात महिला नेतृत्वाला संधी मिळाली आहे.

## श्री चक्रधर स्वामी मंदिराला 'ब' दर्जा मिळाल्याबद्दल इद्रिस मुलतानी यांचा सत्कार

**सावळदबारा प्रतिनिधी :** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील तीर्थक्षेत्र श्री चक्रधर स्वामी मंदिराला 'ब' दर्जा मिळाल्याबद्दल भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांचा सावळदबारा येथे भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यानी सत्कार केला . मंदिराला 'ब' दर्जा मिळवून देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याबद्दल ग्रामस्थांनी इद्रिस मुलतानी यांचे अभिनंदन केले.



श्री चक्रधर स्वामी मंदिराला 'ब' दर्जा मिळावा, यासाठी इद्रिस मुलतानी यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. टप्प्याटप्प्याने ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

इद्रिस मुलतानी हे सावळदबारा येथे आले असतात भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करत मंदिराला 'ब' दर्जा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

श्री चक्रधर स्वामी मंदिराला 'ब' दर्जा मिळाल्याने सावळदबारा परिसरातील ग्रामस्थ व भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहेत यावेळी सोयगाव तालुका अध्यक्ष सजय पाटील, व्हिजेएटीचे प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, सभापती उत्तम चव्हाण, प. स. सदस्य राहुल राठोड, टिटवी माजी सरपच अज्ञानसिंग चव्हाण, गणेश लोखडे, भावराव कोलते, मुकुदा मानकर, प्रमोद पाटील, मधुकर पुजारी, दिलीप पुजारी, गोपीनाथ पुजारी, जीवन कोलते, संजय चव्हाण, रामचंद्र चिमणकर, सिताराम जाधव, संभाजी पवार, स्वराज डापके, देव आप्पा पंधाडे, दीपक मानकर, रहिम पठाण, एकनाथ सपाटे, राजु दाडगे,विनोद टिकारे, पंढरी साबळे, बेला आप्पा पंधाडे शाताराम खराटे, समाधान नरोटे, गजानन पाटील,सुनील शिपल्कर, यांच्यासह सावळदबारा परिसरातील ग्रामस्थ, भाविक, आदी उपस्थित होते.

## ॲड. प्रियांका साळवे यांचा अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सत्कार



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील ॲड. प्रियांका संजय साळवे यांनी विधी क्षेत्रात यश संपादन केल्याबद्दल त्यांचा माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अब्दुल सत्तार यांनी ॲड. प्रियांका साळवे यांना पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विधी शिक्षण पूर्ण करून ॲडव्होकेट म्हणून यशस्वी झाल्याबद्दल प्रियांका साळवे यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले. ग्रामीण भागातील तरुणींनी शिक्षणाच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत यश मिळवावे, असे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. या सत्कार सोहळ्यास केशवराव तायडे, पंचायत समिती सदस्य शेख सलीम, सरपंच डॉ. सलमान खान, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष संदीप राऊत, माजी सरपंच इस्माईल कुरेशी, शामराव होळकर यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ॲड. प्रियांका साळवे यांनी सत्काराबद्दल उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. त्यांच्या यशाबद्दल शिवना परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे नूतनीकरण अर्ज, 15 सप्टेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या, मात्र प्रवेश न मिळालेल्या अथवा प्रवेश न घेतलेल्या तसेच निवारा, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ न शकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध महाविद्यालये व शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात येते.

सन २०२५-२६ या वर्षात स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाइन नूतनीकरण करण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत समाज कल्याण विभागाच्या "अधिकृत पोर्टलवर" **https:**//hmasnew.mahait.org सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नूतनीकरण अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांनी मागील वर्षाचे गुणपत्रक अपलोड करणे तसेच चालू शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे.

मागील वर्षी नूतनीकरण अर्ज करून स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना तसेच मागील वर्षी प्रथम वर्षासाठी अर्ज करून योजनेचा लाभ मिळालेल्या विद्यार्थ्यांनाही विहित मुदतीत नूतनीकरण अर्ज सादर करता येणार आहे. स्वाधार योजनेचा लाभ वेळेत मिळण्यासाठी सन २०२५-२६ मध्ये योजनेचा लाभ घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत नूतनीकरण अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करावा. विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यास संबंधित विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तरी पात्र सर्व विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपले नूतनीकरण अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, आर.एच. एडके यांनी केले आहे.

### बैठकीत सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांचा समावेश. सर्वच पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपोषणात होणार सहभागी

# 40 वर्षांचा अन्याय आता निर्णायक लढाईत! : हनुमान कोळीवाडा(शेवा कोळीवाडा )व नवीन शेवेच्या पुनर्वसनासाठी ग्रामस्थांचा एल्गार

### 15 ऑगस्टला जेएनपीए प्रशासन भवनासमोर उपोषण ; "बनावट व चुकीची 2 आज्ञापत्रे रद्द करा; विस्थापितांना न्याय द्या, पूर्ण पुनर्वसन करा!" विस्थापितांची मागणी. हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा(शेवा कोळीवाडा )व नवीन शेवे या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित असल्याने ग्रामस्थांचा संताप आता उफाळून आला आहे. जेएनपीए प्रकल्पासाठी स्थानिकांनी जमीन, घरे देऊन आणि पारंपरिक उपजीविकेवर परिणाम सहन करूनही पुनर्वसनाचा प्रश्न अद्याप पूर्णत्वास न गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे आता "आश्वासन नको, निर्णायक निर्णय हवा!" अशी आक्रमक भूमिका घेत ग्रामस्थांनी आंदोलनाची घोषणा केली आहे.




नवीन शेवा व शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) ग्रामस्थांच्या वतीने रविवार दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता श्री शांतेश्वरी मंदिर नवीन शेवा येथे महत्वाची बैठक संपन्न झाली.या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले.१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी रोजी जेएनपीए प्रशासन भवन समोर उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला.या बैठक प्रसंगी माजी आमदार मनोहरशेठ भोईर, पंचायत समिती सदस्य दिपक भोईर, सरपंच सोनल घरत,नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळचे अध्यक्ष कमळाकर पाटील,उपाध्यक्ष लक्ष्मण म्हात्रे, भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत,तंटामुक्ती समिती अध्यक्ष कृष्णा घरत,सल्लागार बाळकृष्ण पाटील,शाखाप्रमुख शैलेश भोईर,सल्लागार पंडित घरत, काँग्रेसचे जेष्ठ नेते कमळाकर घरत,शिवसेनेचे गणेश म्हात्रे,ग्रामसुधारणा मंडळ हनुमान कोळीवाडा अध्यक्ष सुरेश कोळी,खजिनदार नितीन कोळी,माजी सरपंच परमानंद कोळी, सामाजिक कार्यकर्ते हरेश कोळी,नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे सल्लागार हेमंत म्हात्रे, एकनाथ घरत, नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा गावचे प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर महत्वाच्या बैठकीत शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर,नवीन शेवा ग्रामपंचायत सरपंच सोनल घरत, नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमळाकर पाटील,भाजपचे चंद्रकांत घरत, सल्लागार पंडीत घरत,शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा )ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष सुरेश कोळी, माजी सरपंच परमानंद कोळी आदी पदाधिकारी मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या बैठकीत पुनर्वसनाच्या प्रक्रियेत गेल्या ४० वर्षांपासून अन्याय व फसवणूक होत असल्याचा आरोप ग्रामस्थ व विस्थापितांमार्फत करण्यात आला आहे. तसेच २ बनावट अथवा चुकीचे आज्ञापत्रे तयार करून जेएनपीए (एनएसपीटी) व शासनाने दोन्ही गावांची फसवणूक केल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे. या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणण्याची मागणी बैठकीत सर्वानुमते करण्यात आली आहे.

"बनावट आज्ञापत्रांमागील सत्य बाहेर काढा!"अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आले.

ग्रामस्थांच्या तीन प्रमुख मागण्या उपोषणाच्या केंद्रस्थानी आहेत. बनावट व चुकीची २ आज्ञापत्रे रद्द करा तसेच त्या आज्ञापत्राने दिशाभूल करणाऱ्या कारभाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी पहिली मागणी आहे.

दुसरी विस्थापितांची फसवणूक केल्याच्या आरोपांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर १५ दिवसांत कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तर सर्वात महत्त्वाची मागणी म्हणजे नवीन शेवा आणि शेवा कोळीवाडा गावांचे न्याय्य व पूर्ण पुनर्वसन तातडीने करावे.अशा तीन मागण्या करण्यात आले.

१५ ऑगस्टला जेएनपीए प्रशासन भवनासमोर उपोषण करण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी आता आंदोलनाची ठोस दिशा जाहीर केली असून शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता जेएनपीए प्रशासन भवन समोर उपोषण करण्यात येणार आहे.

"४० वर्षांचा अन्याय... आता निर्णायक लढा!" असा निर्धार व्यक्त करत हजारोंच्या संख्येने विस्थापित ग्रामस्थांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. न्यायासाठी सर्वांनी एकजुटीने उभे राहण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

पुनर्वसनाचा प्रश्न केवळ प्रशासकीय फाईलमध्ये अडकवून ठेवण्याची वेळ आता संपली पाहिजे, अशी संतप्त भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नावर शासन आणि जेएनपीए प्रशासनाने कालबद्ध निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा बैठकीत देण्यात आला आहे. विस्थापित तसेच

ग्रामस्थांच्या मते, पुनर्वसनाशी संबंधित सर्व आदेश, आज्ञापत्रे, नोंदी आणि कागदपत्रांची पारदर्शक तपासणी करून पात्र विस्थापितांना कायद्यानुसार न्याय मिळणे गरजेचे आहे. संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा )आणि नवीन शेवेच्या ग्रामस्थांनी एकजूट, संघर्ष आणि विजय या निर्धाराने आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. १५ ऑगस्टच्या आंदोलनातून चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसनाच्या प्रश्नाला निर्णायक वळण देण्याचा ग्रामस्थांचा प्रयत्न आहे."४० वर्षे अन्याय सहन केला; आता आणखी प्रतीक्षा नाही.असा संकल्प करण्यात आला असून बनावट व चुकीच्या आज्ञापत्रांच्या आरोपांची चौकशी करा, दोषींवर कारवाई करा आणि शेवा कोळीवाडा गावातील २५६ कूटूंबांचे व शेवा गावातील ३६५ कूटूंबांचे शासनाचे मापदंडाने दि.१२/११/१९८२ते १५/०१/१९८८ सालात पायरी पायरीने मंजूर असलेले पूर्ण व न्याय्य पुनर्वसन करा," अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.आता या आंदोलनाची दखल घेऊन जेएनपीए प्रशासन, राज्य शासन आणि केंद्र शासन कोणती ठोस भूमिका घेतात, याकडे उरण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सेव्हन हिल उड्डाणपुलावर बेशिस्त थांबे; अपघाताला निमंत्रण!

## उतारावर वाहनांचा वेग अन् त्याच ठिकाणी पाण्याचे टेम्पो, चारचाकींचे थांबे; दुभाजक ओलांडून दुचाकींचे धोकादायक वळण

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सेव्हन हिल उड्डाणपुलावर वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून वाहने थांबविण्याचे प्रकार सुरू असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः उड्डाणपुलाच्या उतारावर वाहनांचा वेग अधिक असताना रस्त्यावरच चारचाकी, मालवाहू वाहने तसेच पाण्याचे टेम्पो थांबत असल्याने मागून येणाऱ्या वाहनचालकांसमोर अचानक अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

उड्डाणपुलावरील दुभाजकाची उंची व रचना काही ठिकाणी दुचाकीस्वारांना विरुद्ध दिशेने वळण्यासाठी सोयीची



ठरत असल्याचे दिसून येते. वेळ वाचविण्यासाठी काही दुचाकीस्वार थेट विरुद्ध बाजूने वळण घेतात. त्याचवेळी चारचाकी वाहनेही रस्त्याच्या कडेला थांबविली जात असल्याने वाहतुकीच्या प्रवाहावर परिणाम होतो.

उड्डाणपुलाच्या परिसरात पाण्याचे जार वितरित करणारा टेम्पो रस्त्यावर थांबवून ग्राहकांना जार देण्यासाठी चालक जात असल्याचे दिसून येते. ग्राहकाला पाणी देण्यासाठी काही क्षणांसाठी वाहन थांबविले जात असले, तरी वर्दळीच्या आणि उताराच्या रस्त्यावर अशा पद्धतीने वाहन उभे राहणे धोकादायक ठरू शकते. मागून वेगाने येणाऱ्या वाहनाला अचानक थांबलेल्या टेम्पोचा अंदाज न आल्यास अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

या परिसरात वाहतूक पोलिसांनी नियमित गस्त वाढवून रस्त्यावर वाहने थांबविणाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच विरुद्ध दिशेने वळण घेणाऱ्या दुचाकीस्वारांवरही दंडात्मक कारवाई होणे गरजेचे आहे.

# बनावट विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

## 5 लाख 80 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल जप्त



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य उत्पादन शुल्क विभाग छत्रपती संभाजीनगर मुख्यालयाने बनावट विदेशी दारू तयार करून त्याची वाहतूक करणाऱ्या इसमांविरुद्ध एक मोठी धडक कारवाई केली आहे. ही कारवाई दिनांक १० ऑगस्ट रोजी पळसगाव शिवार येथील हॉटेल विवान समोर रोडच्या कडेला सापळा लावून यशस्वीपणे पार पाडण्यात आली. निरीक्षक ए. एन. साळोखे आणि त्यांच्या कार्यालयातील स्टाफला गस्तीवर असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती. एका काळ्या रंगाच्या मारोती स्विफ्ट चारचाकी वाहनातून (क्रमांक एम.एच. ०२ बी.एम. ०६४६) पानपोई-शिऊर रोडने बनावट विदेशी दारूची वाहतूक होणार असल्याची खात्रीशीर माहिती होती. माहितीच्या आधारे पथकाने पळसगाव शिवार येथील हॉटेल विवान समोर सापळा लावला असता, काही वेळने संबंधित काळ्या रंगाची मारोती स्विफ्ट कार जाताना दिसली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदर वाहन अडवून पंचसमक्ष त्याची झडती घेतली. झडतीदरम्यान वाहनात मोठ्या प्रमाणावर बनावट विदेशी मद्यसाठा आढळून आला.

जप्त केलेल्या मद्यसाठ्याच्या विविध बॅचेसच्या ९६ सिलबंद बाटल्या (०२ कागदी खोक्यात) यांचा समावेश होता. असा एकूण १४४० बाटल्यांचा मद्यसाठा मिळून आला, ज्याची अंदाजे किंमत ३,४५,६०० रुपये आहे. याशिवाय दोन मोबाईल आणि वाहतुकीसाठी वापरलेली चारचाकी गाडी असा एकूण ५,८०,६०० (पाच लाख ऐंशी हजार सहाशे रुपये मात्र) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी किरण ज्ञानेश्वर उगले आणि मंगेश घनशाम जाधव या दोघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (अ) (ब) (ई), ८१, ८३, ९०, १०३, १०८ अन्वये राज्य उत्पादन शुल्क क-१ विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालयात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही कारवाई निरीक्षक ए. एन. साळोखे, दुय्यम निरीक्षक एस. बी. माने, दुय्यम निरीक्षक पी. व्ही. मुंगडे, दुय्यम निरीक्षक ए .टी. निमगिरे, के. सपकाळ, तसेच जवान एम. एच. बहुरे, ए. जी. शिंदे, एस. बी. महाले, एस. पी. रिंढे आणि वाहन चालक ए. एन. शेख यांनी केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस. बी. माने करत आहेत.

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत पर्यटकांचा जीवघेणा' प्रवास एसटीच्या भंगार' बसने काढली आंतरराष्ट्रीय पातळीवर अब्रू

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर जगाच्या नकाशावर भारताची मान अभिमानाने उंचावणाऱ्या जगप्रसिद्ध अजिंठा लेणीला पाहण्यासाठी सातासमुद्रापारून पर्यटक येतात पण तिथे पोहोचल्यावर त्यांच्या स्वागताला काय उभं असतं तर चक्क एसटी महामंडळाचा मोडकळीस आलेला भंगार सांगाडा होय टी पॉइंट ते मुख्य लेणीपर्यंतचा प्रवास सध्या पर्यटकांसाठी एखाद्या भयानक रोलरकोस्टर' राइडपेक्षा कमी राहिलेला नाही

खटारा' बस की मृत्यूचा सापळा

या बसेसमध्ये पाऊल ठेवताच पर्यटकांचा जीव अक्षरश मुठीत असतो चालती बस आहे की वाजणारा खुळखुळा असा प्रश्न पडावा इतका भयंकर खडखडाट या गाड्यांच्या केबिन आणि संपूर्ण बॉडीमधून येतो लेणीकडे जाणाऱ्या चढणीवर तर गाडीचा असा काही श्वास कोंडतो की आता ही बस मागे तर घसरणार नाही ना या भीतीने पर्यटकांच्या काळजाचा ठोकाच चुकतो आतली अवस्था तर त्याहून भयंकर सीट्स




इतक्या फाटलेल्या आहेत की बसण्यापेक्षा उभं राहिलेलं बरं अशी पर्यटकांची अवस्था होते

तिकिटाच्या नावाखाली 'लूट सुविधा मात्र शून्य

एका बाजूच्या अवघ्या ४ किलोमीटरच्या अंतरासाठी पर्यटकांच्या खिशातून थेट २० रुपये येण्या-जाण्याचे ४० रुपये उकळले जात आहेत एसटी महामंडळ या मार्गावरून दररोज लाखो रुपयांची मलाई खात आहे पण नवीन गाड्या देण्याच्या नावावर प्रशासनाने अक्षरश डोळ्यांवर पट्टी बांधली आहे

पर्यटकांचा संताप अनावर

पश्चिम बंगालहून आलेले पर्यटक ॲड बिनोद एस बिस्वास यांनी तर प्रशासनाचे वाभाडेच काढले अशा अत्यंत बिकट आणि भंगार गाड्यांमधून प्रवास करण्यापेक्षा या जागतिक वारसा स्थळावर प्रदूषणमुक्त ई-बसेस इलेक्ट्रॉनिक बसेस का दिल्या जात नाहीत असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे

आता सर्वात मोठा प्रश्न हा आहे की जगभरातील व्हीआयपी आणि परदेशी पर्यटकांसमोर महाराष्ट्राची अशी लक्तरे वेशीवर टांगली जात असताना झोपेचे सोंग घेतलेले प्रशासन एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच जागे होणार का

# स्वातंत्र्यदिन सोहळ्याची पूर्वतयारी बैठक संपन्न; विभागीय आयुक्त कार्यालय प्रांगणात पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापनदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते होणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०५ वाजता या मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात सहआयुक्त (साप्रवि) मंजुषा मिसकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. या मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखून परिपूर्ण तयारी करावी, असे स्पष्ट निर्देश सहआयुक्त मंजुषा मिसकर यांनी या बैठकीत दिले.

सदर बैठकीस उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांच्यासह महसूल, गृह विभाग, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, माहिती विभाग आदी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त मनपा शाळांमध्ये महिला कीर्तनकारांचा राष्ट्रीय कीर्तन सप्ताह

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी रुजविण्याच्या उद्देशाने 'देव, देश, धर्म – समाज प्रबोधन ग्रुप'च्या वतीने शहरातील मनपा शाळांमध्ये राष्ट्रीय कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या प्रेरणेने आणि शिक्षण



विभागप्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी भरत तीनगोटे, प्रशासन अधिकारी संजीव सोनार, विस्तार अधिकारी रईसा बेगम, विजय कोल्हे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे तसेच सर्व केंद्रीय मुख्याध्यापक उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहेत.

या उपक्रमांतर्गत ७ ऑगस्ट रोजी मुकुंदवाडी, ८ ऑगस्ट रोजी प्रियदर्शिनी मनपा शाळेत ह.भ.प. मंजुषा लक्करस यांनी कीर्तन सादर केले. १० ऑगस्ट रोजी चिकलठाणा येथे ह.भ.प. प्रिती जोशी, ११ रोजी विटखेडा येथे ह.भ.प. सुलभा केतकर, १२ रोजी एन-७ येथे ह.भ.प. स्वाती पंडे आणि १३ ऑगस्ट रोजी हर्सूल येथे ह.भ.प. द्राती खडके विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती, संतपरंपरा, भारतीय संस्कृती व सामाजिक जाणीवेचा संदेश देणार आहेत.

या उपक्रमाची संकल्पना मीना तांबोळी व सुजाता केतकर यांची असून नंदिनी पोळ, वर्षा ब्रह्मपुरकर, तेजस्विनी कुलकर्णी यांच्यासह सदस्य परिश्रम घेत आहेत. मृदंगावर दिनेश डोळे, तर तबल्यावर श्रीनिवास कुलकर्णी साथ देत आहेत.

# मराठा अधिकारी-कर्मचारी संघाचे प्रथम राष्ट्रीय अधिवेशन उत्साहात

## व्याख्यान, समाजमेळावा आणि रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा अधिकारी व कर्मचारी संघ, भारत यांच्या वतीने आयोजित प्रथम राष्ट्रीय अधिवेशन प्रवरा संगम येथे रविवार, दि. ९ रोजी उत्साहात पार पडले. या अधिवेशनासाठी देश-विदेशासह राज्याच्या विविध भागांतून समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रबोधन, सामाजिक बांधिलकी आणि समाजहिताचा संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांना यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




अधिवेशनात व्याख्यान, समाजमेळावा तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक एकोपा, शिक्षण, संघटन आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी संघाचे अध्यक्ष लक्ष्मण खटिंग, सचिव अनिल पाटील सर, उपाध्यक्ष पृथ्वीराज वाघाडे, येवले, रावसाहेब जंगले, मुकुंद खिस्ते, प्रदीप पाटील, अनिल बावणे, गोविंद तांगडे, मुंजा गिराम, संजय घोलप, कृष्णा दुधाते, टेमक, गोविंद मुळे, दशरथ ढोले, एकनाथ बेलेकर, सचिन पाटील आणि किसान तुपे यांनी परिश्रम घेतले.

घाटीच्या रक्तपेढीचे विशेष सहकार्य

रक्तदान शिबिरासाठी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय रक्त केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, उपअधिष्ठाता डॉ. भारत सोनवणे आणि रक्तपेढीच्या डॉ. अंजली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शुभम गुसिंगे, डॉ. झोहरा, डॉ. नम्रता राठोड, तंत्रज्ञ पाध्ये, समुपदेशक कोकिळा साबळे, अंजली, कुशल, संदीप, सरफराज आणि मजहर शेख यांनी रक्तदान शिबिरासाठी सहकार्य केले.

# तलाठी सज्जा लोहगाव येथील तलाठी बदलण्याची मागणी

हिंगोली | लोहगाव (ता. जि. हिंगोली) येथील तलाठी सज्जामध्ये कार्यरत तलाठी श्री. चोरमारे यांची तात्काळ बदली करून त्यांच्या जागी अनुभवी व नागरिकांशी योग्य संवाद साधणाऱ्या तलाठ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी काँग्रेस अनुसूचित जमातीचे हिंगोली तालुकाध्यक्ष दिपक नंदाबाई आश्रोबा सोनुळे यांनी नायब तहसीलदार यांच्याकडे सोमवारी निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, लोहगाव तलाठी सज्जामध्ये कार्यरत तलाठी श्री. चोरमारे यांच्याबाबत गावातील अनेक नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तलाठी सज्जाच्या ठिकाणी नेहमी गैरहजर राहणे, नागरिकांशी असभ्य भाषेत बोलणे, शासकीय कामासाठी नागरिकांना इतर खासगी व्यक्तींकडे जाण्यास सांगणे, कामाच्या वेळेत दारूच्या नशेत नागरिकांशी उद्धट वर्तन करणे तसेच कामासाठी आलेल्या नागरिकांना चुकीची माहिती देऊन संभ्रमित करणे, अशा स्वरूपाच्या तक्रारी निवेदनात नमूद करण्यात आल्या आहेत.

लोहगाव परिसरातील क्षेत्रफळ मोठे असून २ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र असल्याने येथे अनुभवी व सक्षम तलाठ्याची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तलाठी श्री. चोरमारे यांना कामाप्रती गांभीर्य नसल्याने तसेच नागरिकांशी त्यांचे वर्तन व संवाद योग्य नसल्याने त्यांची तात्काळ बदली करून लोहगाव येथे अनुभवी तलाठ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणी योग्य ती कार्यवाही न झाल्यास लोहगाव ग्रामस्थांच्या वतीने लोकशाही मार्गाने मागणी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिपक सोनुळे संदीप बोडखे एकनाथ माघाडे अजय फूफाटे आदींनी निवेदनातून देण्यात आला आहे.

# श्री श्री 1008 महामंडलेश्वर अशोक पवार महाराज यांना वाशिंग्टन युनिव्हर्सिटीअमेरिका याच्या कडून डॉक्टररेट पदवी प्रदान

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी,:-** गेले अनेक वर्षापासून सामाजिक कार्यामध्ये सक्रिय होऊन सामाजिक कार्य आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून आयुष्यभर सामाजिक कार्यामध्ये स्वतःला झोकून घेणाऱ्या. नेहरू युवा केंद्राचा 2002 ला सद्भाव पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर सामाजिक कार्याचे जोरदार सुरुवात झाली त्यामध्ये देवदासी हा विषय समोर धरून देवदासी महिलांसाठी विविध मेळावे व त्यांच्या उत्पन्न होणाऱ्या समस्या त्यांचे राशन कार्ड असेल त्यांचा पेन्शनचा प्रश्न असेल त्यांच्या आरोग्याचा प्रश्न असेल किंवा त्यांच्या मुलाचे शिक्षणाचा प्रश्न असेल अशा विविध प्रश्नावर सातत्याने कार्य करण्यास सुरुवात केली याचीच नोंद घेऊ नेहरू युवा केंद्राने केंद्र सरकारचा परभणी जिल्ह्याचा आदर्श युवा पुरस्कार 2004 मध्ये ज्येष्ठ साहितिक बा. ह. कल्याणकर यांच्या हस्ते प्रजासताक दिनाचे औचित्य साधून नेहरू या केंद्राचा आदर्श युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यानंतर खऱ्या कामाची सुरुवात झाली यामध्ये अपंग मुलांचे व संगोपन व पुनर्वसन विविध विषयावर तसेच महिलांच्या विविध विषयावर त्यांचा आरोग्याचा प्रश्न रोजगाराचा प्रश्न शिक्षणाचा प्रश्न व स्त्री स्ववलंबानाचा प्रश्न महिला व बाल अपंग बालके वृद्ध आजी आजोबांसाठी सातत्याने कार्य सुरू केले सामाजिक कार्यामध्ये वृक्षारोपण गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व शालेय गणवेश वाटप सातत्याने चालू त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न हाती घेऊन वाटचाल करत असताना या कार्याची दखल घेऊन प्रदीप फाले यांच्या सहकार्याने वाशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटी ने या सामाजिक कार्याची नोंद घेऊन 8.8. 2026 रोजी नवी दिल्ली फरीदाबाद सरोवर इंटरनॅशनल हॉटेलमध्ये विविध



क्षेत्रातील सेलिब्रिटी व दिल्लीचे डी आय जी व केंद्रीय समाज कल्याण सचिव व विविध सात कुलगुरूंच्या उपस्थितीत व 35 देशांच्या प्रतिनिधी सह भारतातील विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या डॉक्टररेड इंजिनियर्स संशोधक सामाजिक धार्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या 300 मान्यवरांना डॉक्टररेट पदवी बहाल करण्यात आली प्रदेशासह संपूर्ण भारताच्या कानाकोपऱ्यातून विविध मान्यवरांच्या उप स्थितीत मोठ्या जल्लोषाच्या वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाचे संयोजन वाशिंग्टन युनिव्हर्सिटीअमेरिका यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले या निवडीबद्दल श्री श्री 1008 महामंडलेश्वर धर्मगुरू डॉ प्रदीप चैतन्य फाले महाराज, श्री धाराजी भुसारे श्री सतीश टाकळकर श्री गणेश सूर्यवंशी श्री प्रभू दीपके सत्यजित गावंडे श्री प्रवीण देशपांडे श्री अतुल शहाणे राजकुमार हट्टेकर नायकवाडे सर अरुणकुमार रणखांबे. लक्ष्मण मानोलीकर मोईन खान विठ्ठल वडकुते रामेश्वर शिंदे सुधाकर श्रीखंडे प्रकाश साळवे लक्ष्मीकांत बनसोडे शिवशंकर सोनुने मोहसीन खान शिवाजी वाकोडे संघपाल अडागळे मंदार कुलकर्णी पांडुरंग अंभोरे अनिल दाभाडकर सुनील सुतारे दिलीप बोरकर संजय घनसावत बालाजी कांबळे राहुल धबाले सुदेश आगळे अर्जुन शिंदे अमोल कांबळे शिवा गायके विक्रम रोडे महेश आगळे शुभम कुमार करण कुमार लोंढे बाबुराव अवचार आदित्य कुमार कांचन पवार सुनील रण बावळे प्रभाकर प्रधान. धोंडीराम गवाले adv अमोल कांबळे अक्षय जोगदंड बालासाहेब काळे लखन कुमार वावळे आदींनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911